महापालिका आयुक्त कार्यालय
पुणे महानगरपालिका
जावक क्र.- मआ/दुप्रा/७१६
दिनांक -०३/०६/२०२६

कार्यालयीन आदेश

विषय - सन २०२६-२०२७ या कालावधीत "हरित पुणे,समृद्ध पुणे" मोहिमेअंतर्गत वृक्षांची लागवड करणेबाबत.

पुणे शहराच्या पर्यावरणाचे संतुलनासाठी व शहराचे तापमान आरोग्याचे दृष्टीने योग्य राहण्यासाठी मोठ्या प्रमाणावर वृक्षारोपण व संवर्धन करणे काळाची गरज आहे.पुणे शहर हरित होण्याच्या दृष्टीने वृक्ष प्राधिकरणामार्फत यावर्षी देखील स्थानिक वृक्षांची लागवड करण्यात येणार आहे.

पुणे शहर हरित करण्याच्या दृष्टीने नागरिक / संस्था यांचे सहकार्य मिळावे यासाठी पुणे महानगरपालिका हद्दीमध्ये शासकीय,निमशासकीय,अशासकीय नोंदणीकृत संस्था/सहकारी गृहरचना संस्था, स्वयंसेवी संस्था तसेच शाळा,महाविद्यालये व नागरिक यांना पुणे महानगरपालिकेतर्फे जाहिर आवाहन करण्यात आलेले आहे.

सन २०२६-२०२७ करिता पुणे महानगरपालिकेस अपेक्षित वृक्ष लागवड उद्दिष्ट पूर्तता करण्यासाठी विभागनिहाय वृक्षारोपणाचे उदिष्ट पुढील प्रमाणे देण्यात आहे.

अ.क्र.	विभागाचे नाव	वृक्षारोपणाचे उद्दिष्टे (वृक्ष संख्या)
१)	सर्व क्षेत्रिय कार्यालय – वृक्ष प्राधिकरण विभाग	७५०००
२)	पथ विभाग	१५०००
३)	भवन विभाग	१५०००
४)	प्रकल्प विभाग	१५०००
५)	मलनिस्सारण विभाग	१५०००
६)	पाणी पुरवठा विभाग	१००००
७)	शालेय शिक्षण विभाग (प्राथमिक शिक्षण)	२५००
८)	शालेय शिक्षण विभाग (माध्यमिक व तांत्रिक विभाग)	२५००
९)	शहर सौंदर्यीकरण कक्ष (बांधकाम परवाना विभाग)	१००००
१०)	घनकचरा व्यवस्थापन विभाग	५०००
११)	उद्यान विभाग	५०००

सबब आपणास आदेशित करण्यात येते कि, माहे - ऑक्टोबर २०२६ अखेर प्रत्येक विभागाने दिलेले वृक्षारोपणाचे उदिष्ट पूर्ण करावायचे आहे. त्याकरिता प्रत्येक विभागाने विशेष अभियान राबवून वृक्ष लागवड करून घेण्यात यावी.

संबंधित विभागामार्फत केलेल्या वृक्ष लागवडीबाबतची साप्ताहिक माहिती सोबत जोडलेल्या "परिशिष्ट -अ" प्रमाणे सह महापालिका आयुक्त तथा सदस्य सचिव, वृक्ष प्राधिकरण यांचेकडे दर सोमवारी सादर करावी. तसेच सदर अभियान अंतर्गत केलेल्या कार्यवाहीचा फोटोसह अहवाल

संबंधित विभागाने पुणे महानगरपालिकेच्या सर्व सोशिअल मेडीया प्लॅटफॉर्मवर देखील प्रसिद्धीस द्यावा.

(नवल किशोर राम)
महापालिका आयुक्त
पुणे महानगरपालिका

प्रत - १) अतिरिक्त महापालिका आयुक्त (विशेष/जनरल/इस्टेट),पुणे महानगरपालिका
२) सर्व खाते प्रमुख
३) उप आयुक्त (परिमंडळ क्र. १ ते ५)
४) महापालिका सहाय्यक आयुक्त तथा वृक्ष अधिकारी (सर्व १ ते १५ क्षेत्रीय कार्यालय)

परिशिष्ट - अ

विभागाचे नाव - .....

दिनांक - ..... ते दिनांक ..... या कालवधीत करण्यात आलेल्या
वृक्ष लागवडीचा अहवाल

अ.क्र.	वृक्ष लागवड करणाऱ्या अधिकारी / कर्मचाऱ्याचे नाव व संपर्क क्रमांक , ई मेल आयडी	वृक्ष लागवडीचा दिनांक	वृक्ष लागवडीचे ठिकाण	वृक्ष लागवडीचे ठिकाणचा अक्षांश व रेखांश	लागवड करण्यात आलेल्या रोपांचे नाव व संख्या	वृक्ष लागवडी पूर्वीचे जीपीएस फोटो गुगल लिंक	वृक्ष लागवडीनंतरचे जीपीएस फोटो गुगल लिंक